# हिंगोली जिल्हयातील कोरोनाच्या काळात अध्ययन -अध्यापन पध्दतीच्या माध्यमामध्ये झालेला बदल यांचा शोध व उपाययोजना

**श्रीमती पाटील सत्वशिला गोरखनाथ**

**जि.प.प्रशाला जवळाबाजार,**

**ता.औंढा ना.जि.हिंगोली**

**गोषवारा**

COVID-19च्या काळात कोरोनाव्हायरसचा प्रभाव वाढत गेला .शासनाने सर्व शाळा बंद केल्या पण शिक्षण चालू ठेवले .आता मूलांना या परिस्थितीत कसे अध्ययन -अध्यापन हा प्रश्न सर्वासमोर आला .तसेच शासनाचा प्रस्ताव समोर आला कि " शाळाबंद पण शिक्षण चालू "हा उपक्रम शिक्षणांचा ऑनलाईन मार्गदर्शनाची सूरूवात झाली . तेथूनचं ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणाला सूरूवात झाली .ऑनलाईन शिक्षणामध्ये गूगल मिट, झूम मिंटिग, व्हिडीओ कॉलिग यूट्यूब चॅनल ई.माध्यमातून ऑनलाईन क्लासला सूरूवात झाली .तसेच जेथे ऑनलाईन सूविधा पोहचू शकत नाही तेथे ऑफलाईन पध्दतीने मूलांना अध्यापन करू लागले.त्यात वाडी, वस्त्या, मंदिरे, शाळेवरील भिंती घरोघरी शिक्षण ऑफलाईन स्वाध्यायमाला, प्रश्नावली ई.वापर करू लागले आपआपल्या- -परीने आपल्या विद्यार्थांना शिक्षण कसे देता येईल याकडे शिक्षकांचे लक्ष असे.मूलांनाही शाळा, वर्गखोल्या हे सोडून घरी मोबाईल, लॅपटॉप यासमोर बसून अध्ययन करू लागले, शिक्षक मूलांना शिकविण्यासाठी वेगवेगळी मार्ग अवलंब करून विद्यार्थांना अध्ययनासाठी प्रेरित करू लागले,

अशा बदलत्या परिस्थितीत अध्ययन -अध्यापन पध्दतीच्या माध्यमामध्ये झालेल्या बदलाचा आढावा घेण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून शोध व उपाय कोणते करत आहे, हे पाहण्यासाठी प्रश्नावली, मूलाखती , मुख्याध्यापकाशी चर्चा, या साधनाचा उपयोग करून "हिंगोली जिल्हयातील कोरोनाच्या काळात अध्ययन -अध्यापन पध्दतीच्या माध्यमामध्ये झालेला बदल याचा शोध व उपाय -एक अभ्यास "

या संशोधनात शिक्षकांना, विद्यार्थांना, पालकांना प्रश्नावली, मूख्यादयापकांच्या मूलाखती व अधिका-याशी चर्चा ई साधनाच्या माध्यमातून प्रतिसाद, तक्त्यामध्ये नोंदणी करून पायचार्ट तयार केला या संशोधनात मला 80 टक्के प्रतिसाद मिळाला, महत्व व परिचय –-- मार्च 2020 पासून शाळा, महाविद्यालय बंद पडली, दहावीचा भूगोलचा पेपर

घ्यावयाचा राहीला, महाविद्यालयातील परिक्षा बंद केली, मूलांच्या द्वितीय सत्रांच्या परिक्षाही राहिल्या, शासन काय मार्ग काढेल याकडे सगळ्याचे लक्ष होते, शाळा बंद पण शिक्षण चालू हा उपक्रम चालू केला, अशा परिस्थितीत ऑनलाईन आणि ऑफलाइन शिक्षणाला सूरूवात झाली, डिजिटल तंत्रज्ञान, whatapp वरिल स्वाध्ययमाला, शिकू आंनदे, देखो आपणा देश, गोष्टीचा शनिवार, दूरदर्शन कार्यक्रम, दिक्षाअँप, शंकरअँप, झूम व गूगल मिट चा वापर, यूट्यूबचा उपयोग ई माध्यमाचा वापर सूरू झाला तसेच ऑनलाईन शिक्षण देवू शकत नाही तेथे ऑफलाईन शिक्षणाला सूरूवात केली, शिक्षण आपल्या दारी हीयोजना तयार केली, यासाठी गटकार्य, प्रश्नावली, स्वाध्ययमाला याव्दारे, वाड्या वस्त्या, मंदिरे घरावरील व शाळेवरील भिंती झाड्याच्या फांद्यावर, छपरावर, डोंगरावर अशा ठिकाणी अध्ययनाला सूरूवात झाली. प्रत्येक शिक्षकांनी 100टक्के विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये याकडे शिक्षकांनी लक्ष दिले, अधिका-यांनी वेळोवेळी ऑनलाईन सेमीनार घेवून शिक्षकांना मार्गदर्शन केले, तसेच वेळी शिक्षकांच्या कामाच्या आढावा घेतला, आपल्याला ही कोरोनाच्या काळात शिकवणी कशी आणि विद्यार्थीचे अध्ययन कसे झाले याबदल जानण्याची उत्सूचूकता लागली हे सर्व जाण-याची जिज्ञासा माझा मनात निर्माण झाली, हे संशोधन करावयाचे ठरविले,

उद्दिष्टे

1) अध्ययन – अध्यापनाच्या पध्दतीत कोणकोणती माध्यमे वापरून विद्यार्थीना अध्ययन करण्यास प्रेरित केले याचा शोध घेणे

2)अनेक डिजिटल साधनाचा वापर सर्वापर्यंत झाला का? हे पाहणे,

3) कोरोनाच्या काळात कोणकोणती उपक्रण राबविले यांची पाहणी करून पडताळणी करणे

4) कोरोनाच्या काळात शिक्षकांना शिकविताना आलेल्या समस्यांचा शोध घेवून यात मार्ग कसा काढला यांची पाहणी करणे

5) शिक्षकांनी विद्यार्थीना शिक्षणांच्या प्रवाहात टिकवून ठेवले का याचा शोध घेवून उपाय काय केले हे पाहणे

**संशोधन पध्दती –**

संशोधन म्हणजे काळजीपूर्वक शोध घेणे, अशा कोरोनाच्या काळात नवीन साधनाचा वापर, सातत्यपूर्ण अध्ययन -अध्यापन याचा चिकित्सक सखोल अभ्यास करणे हाहेतू डोळ्यासमोर ठेवून संशोधन केले आहे, स्मॉल यांच्या म्हणण्यानूसार नविन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेले पध्दशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय, या संशोधन समस्येविषया माहिती मिळवीण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे यात प्रश्नावली, मूलाखती, अधिका-याची चर्चा आणि आलेख, तक्तेचा वापर केला आहे.

**संशोधनाची योजना—**


आपल्यासमोर आलेल्या परिस्थिती कसे हाताळणी केली अध्ययन-अध्यापन पध्दतीत माध्यमामध्ये कसे बदल झाले, यासाठी काळजीपूर्वक शोध घेण्याचे ठरविले, शिक्षक डिजिटल साधनाचा वापर करित आहे, हि डिजिटल तंत्रज्ञानाची साहित्य वापर करताना कोणत्या समस्या येतात आणि कसे सोडवितात, शासनांनी ठरविलेली उपक्रम शिक्षक राबवितात. त्यातून विद्यार्थी अध्ययनास प्ररित होतात, विद्यार्थी किती प्रमाणात प्रतिसाद देतात हे पडताळणी त्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला यात शिक्षक, विद्यार्थी, याच्यासाठी प्रश्नावली वापरली संरचित प्रश्नावली, मूक्त प्रश्नावली , बंदिस्त प्रश्नावली असंरचित प्रश्नावली ई,पालक, मूख्याद्यापकांची मूलाखत व अधिका-याशी चर्चा ई साधनाचा वापर केलाआहे. हिंगोली जिल्हात पाच तालूके आहेत, प्रत्येक तालूकातून यादृच्छिक नमूना निवड पध्दतीने शाळेची निवड केली प्रत्येक तालूकातून 15 शाळेची निवड करू असा एकूण 75 शाळेची निवड केली.तेथील शिक्षक(50), विद्यार्थी( 400)म यांना प्रश्नावली दिली, पालकांची व मूख्याध्यापकांची मूलाखात घेतल्या आणि प्रशासकिय अधिका-यांशी चर्चा केली.त्याची तालूकानिहाय विभागणी करून त्याचे प्रमाण काढले. परिकल्पनाची पडताळणी केली त्याचे शेकडा प्रमाण काढले, वरील सांख्यिकाचा उपयोग करून पायचार्ट मध्ये दर्शविले

हिंगोली जिल्हयातील औंढा ना. (15), सेनगाव (15), वसमत (15), कळमनूरी (15), हिंगोली (15) अशा एकुण 75 शाळेची निवड केली. तर 50 शिक्षक, 400 विद्यार्थी, 22 मूख्याध्यापक, 3 अधिकारी व 26 पालकांची निवड करण्यात आली,

1) अनेक डिजिटल तंत्रज्ञान व साधना वापर करतात

| तालूकांचे नाव | प्रतिसादक शाळेची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| वसमत | 14 | 93% |
| औंढा नागनाथ | 12 | 80% |
| कळमनूरी | 13 | 87% |
| सेनगाव | 10 | 67% |
| हिंगोली | 14 | 93% |
| एकूण | 63 | 84% |


वरिल निरीक्षणातून असे आढळून आले की, 84 टक्के अनेक डिजिटल तंत्रज्ञान व साधनाचा वापर करतात,




2)कोरोनाच्या काळातील विविध उपक्रम राबवितात

| तालूकांचे नाव | प्रतिसादक शाळेची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| वसमत | 13 | 87% |
| औंढा नागनाथ | 12 | 80% |
| कळमनूरी | 10 | 67% |
| सेनगाव | 11 | 73% |
| हिंगोली | 12 | 80% |
| एकूण | 58 | 77% |


वरिल निरीक्षणातून असे आढळून आले की, 77 टक्के कोरोनाच्या काळातील विविध उपक्रम राबविले.



3) कोरोनाच्या काळात अध्ययन -अध्यापनापध्दतीच्या माध्यमात झालेल्या बदलातून विद्यार्थांना अध्ययनास प्रेरित करतात

| तालूकांचे नाव | प्रतिसादक शाळेची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| वसमत | 12 | 80% |
| औंढा नागनाथ | 13 | 87% |
| कळमनूरी | 10 | 67% |
| सेनगाव | 14 | 93% |
| हिंगोली | 11 | 73% |
| एकूण | 60 | 80% |


निरीक्षणावरून असे लक्षात आले की, 80 टक्के कोरोनाच्या काळात अध्ययन -अध्यापन पध्दतीच्या माध्यमात झालेला बदलातून विद्यार्थांना अध्ययनास प्रेरित करतात.




4) कोरोना काळात शिक्षकांना उपक्रम राबविताना येणा-या समस्या सोडवितात

| तालूकांचे नाव | प्रतिसादक शाळा | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| वसमत | 11 | 73% |
| औंढा नागनाथ | 12 | 80% |
| कळमनूरी | 12 | 80% |
| सेनगाव | 11 | 73% |
| हिंगोली | 13 | 87% |
| एकूण | 59 | 79% |

निरीक्षणावरून असे लक्षात येते की, 79 टक्के प्रतिसाद कोरोना काळात उपक्रम राबविताना येणा-या समस्या सोडवितात.





**निष्कर्ष व शिफारशी**—कोणत्याही बाबीच्या निष्कर्षाप्रत येण्यासाठी त्या बाबीच्या पूर्तीसाठी निश्चित केलेल्या साधनाच्या आधारे संशोधकाला माहितीची जमवा जमवं करून त्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचनाच्या आधारे निष्कर्षाप्रत येता येते.शिक्षक, विद्यार्थी यांना प्रश्नावली, पालकांच्या व मूख्याध्यापकांच्या मूलाखती आणि अधिकां-याशी चर्चा ई साधनाव्दारे माहिती संकलन करून विश्लेषण करण्यात आले, तक्ते आणि पायचार्ट च्यामाध्यमातून एकूण 80टक्के प्रतिसाद मिळाला.

5) कोरोनाच्या काळात विद्यार्थी शिक्षणांचा प्रवाहात टिकवून राहतात

| तालूकांचे नाव | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| वसमत | 14 | 93% |
| औंढा नागनाथ | 13 | 87% |
| कळमनूरी | 11 | 73% |
| सेनगाव | 11 | 73% |
| हिंगोली | 12 | 80% |
| एकूण | 61 | 81% |

निरीक्षणावरून असे लक्षात आले की, 81 टक्के प्रतिसाद हा कोरोनाच्या काळात शिक्षणांचा प्रवाहात टिकवून राहतात.




**निष्कर्ष व शिफारशी—**

कोणत्याही बाबीच्या निष्कर्षाप्रत येण्यासाठी त्या बाबीच्या पूर्तीसाठी निश्चित केलेल्या साधनाच्या आधारे संशोधकाला माहितीची जमवा जमवं करून त्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचनाच्या आधारे निष्कर्षाप्रत येता येते.शिक्षक, विद्यार्थी यांना प्रश्नावली, पालकांच्या व मूख्याध्यापकांच्या मूलाखती आणि अधिकां-याशी चर्चा ई साधनाव्दारे माहिती संकलन करून विश्लेषण करण्यात आले, तक्ते आणि पायचार्ट च्यामाध्यमातून एकूण 80टक्के प्रतिसाद मिळाला.

**परिशिष्ठे—**

1) शिक्षक प्रश्नावली
2) विद्यार्थी प्रश्नावली
3) पालकांच्या मूलाखती
4) मूख्याध्यापकांच्या मूलाखती
5) अधिका-यांशी चर्चा
6) वृत्तमानपत्रातील बातम्या
7) किशोरवयीन मासिकांतील बातम्या